स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक** 25–08–2014 रोजी **सकाळी** 10–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 5. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 6. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 7. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 8. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 9. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 11. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 12. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 13. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 14. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |
| 15. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. श्याम वर्धने, आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 145 :– नागपूर शहर परिवहन व्यवस्थेत सुधारणा Bus Rapid Transport System (BRTS) करिता JnNURM अंतर्गत वित्तीय सहायता उपलब्ध करवून घेण्या करीता Preparation of Delhi Project Report (DPR) and Project Management Service (PMS) च्या कामाकरिता एक तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्या करीता मागविण्यात आलेली निविदा नुसार एकूण प्राप्त 4 निविदाकारांचे वित्तीय ऑफर पैकी M/s Delhi Integrated Multi – Model System Ltd. यांची प्रथम न्युनतम निविदा वित्तीय ऑफर 1.6% टक्के ची Project Cost Plus applicable service Taxes इतर निविदाकारांचे वित्तीय ऑफर पेक्षा कमी दराचे वित्तीय ऑफर प्राप्त झाल्यामुळे M/s Delhi Integrated Multi – Model System Ltd.यांची वित्तीय निविदा ऑफर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 146</u> :– मौजा सोमलवाडा, खामला, भामटी, टाकळी व जयताळा येथील वर्धा रोड ते जयताळा पर्यंत ऑर्डीनन्स फॅक्टरीकडून 30.49 हेक्टर जागा तहसिलदार नागपूर शहर यांचेकडून महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. जागेचा ताबा महानगरपालिकेकडे आहे. या जागेवर ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर राबविण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याचे काम आर्किटेक्ट हफीज कान्टॅट्रक्टर यांना देण्यात आले. प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार यांनी दिलेल्या रु. 4627 कोटीचा ढोबळ अंदाज सादर केलेला आहे.

उपरोक्त जागेचा वापर वाणिज्यिक, रहिवासी, सामाजिक, शैक्षणिक, कार्यालयीन या कामाकरिता करण्यात येईल. या प्रकल्पात म.न.पा. ची कोणतीही गुंतवणुक राहणार नाही. मात्र, नागपूर शहरात चांगल्या सोई सुविधांची वास्तु तयार होईल व म.न.पा. स याद्वारे उत्पन्न होणे अपेक्षीत आहे. या प्रकल्पापासून शहराचे सौंदर्यात भर पडेल, रोजगारांच्या संधी निर्माण होतील व शहरातील राहणीमान उंचावण्यास मदत होईल.

संबंधित कामाचे पुढील प्रमाणे टप्पे राहतील.

1) विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल.

2) या विस्तृत प्रकल्प अहवालाचे वित्तीय विश्लेषण महाराष्ट्र शासनाचे पी.पी.पी. विशेषज्ञ यांचेद्वारे पृथ्थकरण करुन घेण्यात येईल.

3) निविदा प्रपत्र तयार करण्यात येतील व त्याबाबतच्या कायदेविषयक बाबींची तपासणी विधी सल्लागाराकडून करुन घेण्यात येईल.

पुढील प्रमाणे मंजूरीस्तव सादर.–

अ) मौजा सोमलवाडा, खामला, भामटी, टाकळी व जयताळा येथील वर्धा रोड ते जयताळा पर्यंत ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पाचा पी.पी.पी. तत्वावर विकास करण्याकरिता आर्किटेक्ट हफीज कान्ट्रॅक्टर यांच्या संकल्पनेस मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ब) तसेच विस्तृत प्रकल्प अहवाल, वित्तीय पृथ्थकरण, निविदाप्रपत्र, कायदेविषयक बाबींची तपासणी, ही संपूर्ण प्रक्रिया या प्रकल्पासाठी करणे आवश्यक आहे. याकरिता प्रकल्पास तत्वतः प्रशासकीय मान्यता स्थायी समितीकडून घेणे आवश्यक आहे. जेणे करुन या प्रकल्पा संबंधी विभागास पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल. तसेच हा प्रकल्प अतिशय मोठा असून याची तांत्रिक, विधी व वित्तीय तपासणी विविध तज्ञांकडून करुन घेणेही आवश्यक राहील त्यामुळे प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सुध्दा निविदा काढण्यापूर्वी प्रकल्पातील अटी व शर्ती तसेच प्रकल्पाची व्यवहार्यता राहावी यादृष्टीने विभागास काही बदल करावयाचा झाल्यास हे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देणे व प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 147</u> :– प्रभाग क्र. 42 ब, येथील गरूड खांब रोड येथील शिल्पाटेलर्स ते आयचित मंदिर पर्यंत सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 46,36,866/– (अक्षरी छेचाळीस लक्ष छत्तीस हजार आठसे सहासष्ठ रूपये) रकमेच्या प्रकलनास जूने पद क्र. 682 व नविन पद क्र. A22001330803 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसन निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 148</u> :— प्रभाग क्र. 44 ब, श्रीनगर येथे सिमेंट कॉक्रिट रोडचे काम करण्यास्तव रु. 49,66,982/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 149</u> :— प्रभाग क्र. 22 अ, गिट्टीखदान सदर येथे सि.सी. पेव्हमेंटचे काम करण्याच्या कामास्तव रु. 26,00,000/— (अक्षरी सव्वीस लक्ष फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 150</u> :— प्रभाग क्र. 44 ब अंतर्गत हसनबाग येथील कब्रस्तान च्या बाजूला लेन क्र. 1 व 2 चे रस्ते सिमेंट कॉक्रीटचे बांधकाम करण्यास्तव रू. 31,88,951/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 151</u> :— प्रभाग क्र. 45 अ वाठोडा येथील खसरा क्र. 3,6,16,17 मौजा दिघोरी येथील विनोबा ग्राम गृह निर्माण सह. संस्था, मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रू. 71,09,167/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 152</u> :— नागपूर शहरातील वाहतुक पोलीस पूर्व व दक्षिण शाखे अंतर्गत येणाऱ्या आय. आर.डी. पी./क्रिप रोडला थर्मोप्लास्टीक पेंटनी पार्कींग पट्टा, डिवायडर ऐज लाईन, लेन मार्कींग इ. रोड मार्कींग... करण्याच्या कामास्तव रुपये 27,50,000/— (अक्षरी सत्ताविस लक्ष पन्नास हजार रु. फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 153</u> :— नागपूर शहरातील वाहतुक पोलीस उत्तर, इंदोरा, पश्चिम व एम.आय.डी.सी. शाखे अंतर्गत येणाऱ्या आय.आर.डी.पी./क्रिप रोडला थर्मोप्लास्टीक पेंटनी पार्कींग पट्टा, डिवायडर ऐज लाईन, लेन मार्कींग... इ. रोड मार्कींग करण्याच्या कामास्तव रुपये 47,50,000/— (अक्षरी सत्तेचाळीस लक्ष पन्नास हजार रु. फक्त) प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 154</u> :— प्रभाग क्र. 40 ब खदान येथील सेवासदन विल्डींग पासून धनराजानी यांच्या घरापर्यंत सिमेंट बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 49,99,651/— (अक्षरी एकोणपन्नास लक्ष नव्यान्नव हजार सहाशे एकावन्न रूपये) रकमेच्या प्राकलनास जून पद क्र. 681 व नविन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 155** :– प्रभाग क्र. 3 ब अरविंदनगर पुलापासून ते औद्योगिक परिसर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या करणे व ड्रेन लाईन बांधण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 49,99,993/– (अक्षरी एकोणपन्नास लक्ष नव्यान्नव हजार नऊशे त्र्यानव रूपये) रकमेच्या प्राकलनास जून पद क्र. 370 व नविन पद क्र. A22001330801 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 156** :– प्रभाग क्र. 3 अ संघर्षनगर येथे सिमेंट कॉक्रीटच्या रस्त्यांचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 49,50,258/– (अक्षरी एकोणपन्नास लक्ष पन्नास हजार दोनशे अठ्ठावन रूपये) रकमेच्या प्राकलनास जून पद क्र. 681 व नविन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा व तरतूद मूक्त करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने विषयाचे प्रारुप चुकीचे सादर झाले आहे, असे स्पष्ट केल्यामुळे कार्यालयाने सादर केल्या प्रमाणे प्रीााग क्र. 3 संघर्षनगर येथे सिमेंट कॉक्रीटच्या रस्त्यांचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 6 निविदांपैकी मे. बिंद्रा कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा 23.11 प्रतिशने कमी दराची रु. 38,06,258 (अक्षरी रुपये अडतीस लक्ष सहा हजार दोनशे अठ्ठावण फक्त) रकमेची निम्नत्म निविदा स्विकृत करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 157** :– लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मुख्य मलवाहीकाचे प्राकल्प हिंगना टी पॉईन्ट ते सहकार नगर घाटा पर्यंन्त मुख्य मलवाहीका टाकण्याच्या प्रकल्पातील प्रथम टप्प्याचे कामाबाबातचे प्रस्ताव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 12.5 कोटी रकमेच्या प्राकलनास मंजुरी प्रदान करणे व प्रथम चरणात करण्यात येणाऱ्या कामास रु. 2,00,00,000/– ची तरतुद पद क्र. A43901371913 (नविन भुमिगत नाली निर्माण) मध्ये प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 158** :– जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत मंजुर पेंच टप्पा 4 वाढीव पाणीपुरवठा योजनेतील वितरण प्रणाली टाकण्याकरिता मंजूर कामासंदर्भात खालील प्रस्तावांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. पॅकेज 1अ, 1ब, 2अ, 2ब, 3ब, 4अ, 4ब आणि 5ब या आठ पॅकेज अंतर्गत मंजूर कार्यादेश राशी रु. 14114.08 लक्ष पेक्षा जास्त झालेल्या रु. 437.48 लक्षचे कामास कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. पॅकेज 3अ व 5अ मधील कामे पूर्णत्वास नेण्यासाठी लागणाऱ्या रु. 1072.40 लक्षचे खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. पॅकेज 3 अ व 5अ ची कामे खाली नमुद प्रमाणे वाटप करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| पॅकेज क्र. | कंत्राटदान | कार्यादेश राशी (रु. लक्षमध्ये) |
|---|---|---|
| 3अ | मे. सेंट्रल इंडिया इंजिनिअरींग, नागपूर | रु. 259.50 |
| 3अ | मे. सोनु कंस्ट्रक्शन, नागपूर | रु. 293.40 |
| 5अ | मे. रोजन कंस्ट्रक्शन, नागपूर | रु. 125.00 |
| 5अ | मे. मुरलीधर ॲन्ड कंपनी, नागपूर | रु. 394.50 |
| | एकुण | रु. 1072.40 |

**<u>ठराव क्रमांक 159</u> :–** आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर